म. ग्रं. सं. ठाणें

विषय: चरित्र

लेखक

सन: १८२५

संग्रहालय क्रमांक: ५०

पुस्तकाचें नांव: आत्मारामबाबा रामदासी यांचा इतिहास

५०

चरित्र

र. १८०९
म. ग्रं. सं. ठाणें
विषय चारित्र
नं. ३५९.

॥श्रीरामसमर्थ॥

सं. पं. ३६२
२०१५२

१३.

श्रीराम समर्थ.

सद्गुरु

# आत्माराम बावा रामदासी

संस्थान

# ठाकुरद्वार मुंबई यांचा इतिहास.

विद्वान् लोकांचीं मतें घेण्याकरितां
आत्मारामबावांचे नातू हरिबावा
यांच्या सूचनेवरून
आर.जी.अ.स. छा. चे उत्पादक
यांनीं तयार करून
मुंबईंत
जगदीश्वर छापखान्यांत छापविला.

---

मिती
ज्येष्ठ शुद्ध ११ शके १८१३.



संच. ( ३ ) ५८

श्रीरामसमर्थ.

# सर्व आर्य जनांस विनंति.

ज्या अर्थी सर्वजीवांपेक्षां मनुष्यजातींत
श्वरानें ज्ञानशक्ति विशेष ठेविली आहे त्या
र्थी मनुष्यमात्राचा मुख्य धर्म हाच सिद्ध
ोतो कीं, एकाद्या निरपराधी सज्जनाच्या
रीरास अथवा अंतःकरणास आत्महिताक-
तां कोणी दुःख देऊं लागेल तर आपल्या ज्ञा-
शक्तीप्रमाणें शरीरद्वारा परिश्रम घेऊन त्याच्या
ःखाचें निवारण करावें. कदाचित् इतकी शक्ति
ोणाच्या अंगीं नसेल तर अमुक ठिकाणीं
ा न्याय किंवा अन्याय झाला आहे इतकें त-
 प्रत्येकानें आपलें मत जगतांत प्रसिद्ध कर-
याचें साह्य केलें पाहिजे. त्यांतून सांप्रत तर
र्वांचीं मतें अल्पायासानें सरकारापर्यंत ही पों-
विण्याकरितां वर्तमानपत्रकर्त्यांनीं जागोजाग
डाच उचलिला आहे. हें सर्व मनांत आणून ए-
ा मोठ्या शहरांत एका नामांकित श्रीमंत गृह-
ानें एका जगद्विख्यात महा सत्पुरुषाचा जो

अत्यंत छळ केला व त्या सत्पुरुषाच्या वं
अद्यापही त्या दुःखाचा जो अनुभव येत अ
त्या बद्दलचा मोठ्या परिश्रमानें मिळविलेला र
तिहास न्यायी व दयाशील सज्जनापुढें ठेवीत अ
परमार्थबुद्धीनें या प्रकरणाचे सर्व अस्सल क
पत्र स्वतः पाहून घेऊन जो प्रकार खरा वाटला
संक्षेपानें दर्शित करित आहें. तरी सर्वांनीं कृपा
आपल्या सवडी प्रमाणें परिश्रम घेऊन या प्र
याचें मनन करावें आणि हा झालेला प्रकार न
अथवा अन्याय आहे या अभिप्रायाचे स्वीयो
कोठें तरी आपल्या सहीनें प्रसिद्ध करून पा
ण्यांत यावे. म्हणजे यापासून न्यायाचे भुका
सज्जनाविषयीं दयाळू असे पृथ्वीवर असुक
क आहेत इतकें समजण्यास तरी उत्तम साध
होईल. किंबहुना असें ही होण्याचा संभव आ
कीं ज्यांच्या हातीं अद्याप न्यायाचा फायदा दे
चें सामर्थ्य आहे त्यांच्या ही दृष्टीपुढें हा विषय स
जाऊं शकेल. अलमिति किं विस्तरेण. हे विज्ञप्ति.

चैत्रशुद्ध १ शाके १८१३ } आर. जी. अलीबाग स० सद
छापखान्याचे उत्पादक

॥ श्रीराम समर्थ ॥

# श्रीगुरुआत्माराम महाराज यांच्या वंशाचाइतिहास.

मुंबईत पालवाचा रस्ता म्हणून एक विस्तीर्ण पेठ आहे त्या पेठेंत आत्माराम बावांचें ठाकुरद्वार म्हणून एक संस्थान गर्जत आहे. या संस्थानांत पट्टाभिषिक्त श्रीरामपंचायतनाच्या काळे पाषाणाच्या सुंदर मूर्ति असून मंदिरही पक्कें पाषाणी बांधलेलें आहे व देवा समोर सभामंडपांत आत्मारामबावांच्या समाधीचें काम तर फारच उत्तम आहे. हें संस्थान आत्मारामबावांच्या नांवानें प्रसिद्ध असण्याचें कारण या संस्थानचे मूळ उत्पादक हेच महाराज आहेत. हे महाराज शिरगांव मठांतील रामदास संप्रदायाचे

असून महासत्पुरुषांच्या मालिकेंत
णनीय होते. यांनीं आपल्या हयातींत
मांतक, अमदाबाद वगैरे ठिकाणीं अने
मूर्तींची स्थापना करून तीं संस्थानें
प्रदायी शिष्यांच्या स्वाधीन केलीं. त
च प्रमाणें सुमारें साठ वर्षांच्या मागें
बईंत येऊन हेंही संस्थान केवल भि
वरच तयार केलें. आणि शके १७५०
सालीं भाद्रपदमासीं त्यांत श्रीरामपं
यतनाची स्थापना करून तेथें ब्राह्मण
भोजन, जन्मोत्साहादि अनेक सत्कृ
चालू केलीं. पुढें मोठे मोठे गृहस्थ लोक
त्यांचे संप्रदायी होऊन त्यांची शिष्यश
ाखाही बहुत वाढली. याप्रमाणें त्यांच
सदाचरणाचा फारच लौकिक झाल्य
कारणानें ते महाराज स्वतः जरी विद्वा
रवटपटी नव्हते तथापि त्यांचीं सत्कृ

चालण्या करितां वरींच वर्षासनें ही सुरू झालीं. त्यांपैकीं मुख्य मुख्य येणें प्रमाणें.

२०० श्रीमंत महाराज गायकवाड सरकार सेनाखासखेल.

२०० श्रीमंत व्यंकटराव घोरपडे अमीरुल उमराव सं० बडोदा.

२०० श्रीमंत महाराज सं० सावंतवाडी यांजकडून मिठागर.

५० श्रीमंत महाराज आंग्रेसरकार दोनखंडी भाताचा आकार.

१०० वे० शा० सं० भाऊ पुराणिक बडोद सरकारचे आश्रित.

५० राजमान्य रा० भाऊ सा० काळे सं० बडोदें.

८००

सदरहू प्रमाणें आठशें रुपयांच्या नर सालीना सनदाच मिळाल्या. शिवा-

य त्यांचे शेंकडों शिष्य असल्या कारणा- नें शेंकडों रु० संस्थानांत चालत येत असत. व ते महाराज त्या सर्व उत्पन्ना- चा व्यय उत्साह ब्राह्मणभोजनादि द्वा- रें जेव्हांचे तेव्हां करीत असत. याप्रमा- णें सुमारें सात वर्षे गेल्या नंतर महारा- जांस जरेनें फारच ग्रासलें. कारण त्या वेळीं त्यांचें वय सुमारें ९० वर्षांपर्यंत गे- लें असावें. मग त्यांजला असें वाटूं लाग- लें कीं आपला देहावसानाचा समय थोडे दिवसांवर आला. तेव्हां हें संस्थान आ- पल्या मागें व्यवस्थित चालण्या करितां कोणी तरी सच्छिष्य स्थापन केला पा- हिजे. इतक्यांत पूर्वीची एक गोष्ट अ- शीही स्मरली कीं, मी एकवार बडोद्या- स गेलों होतों. त्यावेळीं श्रीरामभक्त रा- मभाऊ पाटोदेकर राहणार नाशिक यांस

मी उपासना दिली आहे. व त्यांजवर मा-झें अंतःकरण ही बहुत प्रसन्न होतें. त्या वेळीं रामभाऊंनीं माझ्यांजवळ अशी इच्छा दर्शित केली होती कीं मजला आ-पल्याजवळच्या ताम्रमयपंचायतनाच्या मूर्ति मिळाव्या. त्यावेळीं प्रसन्न चित्तानें मीही बोललों होतों कीं ज्यास ही आ-त्मारामनाम मिळेल त्यास या मूर्ति प्राप्त होतील. मग ईश्वराची योजना कोठें अ-सेल ती खरी. हा सर्व प्रकार आत्मा-राम महाराजांस स्मरल्याबरोबर फार-च आनंद झाला. आणि त्यांनीं राम-भाऊंस आणण्याकरितां आपल्या प्रेमांतले वेदमूर्ति बाळकृष्ण भटजी का-ळे यांजला मुंबईहून बडोद्यास तावडतो-ब रवाना केलें. त्याप्रमाणें ते त्वरेनें गेले ही खरे. पण त्यांजला बडोद्यास राम-

भाऊ भेटले नाहींत. व त्यांजला त्यांचा कोठें शोधही लागेना म्हणून ते परत आले. परंतु हा महाराजांचा हेतु पूर्ण व्हावा हें ईश्वराच्याच मनांत सबब एक दिवस महाराजांस रामभाऊंचा असा पत्ता लागला कीं ते रामनवमीचे उत्साहाकरितां केळवें माहिमास आले आहेत. असा शोध लागल्या बराबर महाराजांनीं पुनः वेदमूर्ती बाळकृष्ण भटजी यांस माहिमास पाठविलें. परंतु दिवसें दिवस प्रकृती जास्त बिघडत चालल्यामुळें आपल्या हातून रामभाऊ गादीवर बसतील हा भरंवसा पटेना. सबब मुंबईतील श्रीमंत मंडळीपैकीं लक्ष्मणजी हरिश्चंद्रजी ऊर्फ भाऊ रसूल हे आपल्या प्रेमांतले आहेत असें जाणून त्यांजला महाराजांनीं कांहीं सं-

स्थानसंबंधीं अखत्यार लिहून दिला व सनदापत्रें वगैरे कागदही त्यांच्या हवालीं केले. तो लिहून दिलेला अखत्यार केवळ रामभाऊंस गादीवर बसविण्यापुर्ता व त्यांजला लोकरीतीप्रमाणें मदत देण्यापुरताच होता.

भाऊ रसूलकडे कामाची सोंपणूक होत आहे तों इतक्यांत वेदमूर्ती बाळकृष्ण भटजी माहिमाहून रामभाऊंस घेऊन आले. मग महाराजांस अत्यंतच आनंद होऊन लागलीच तयारी केली. आणि सर्व शिष्यशाखा बलाऊन शके १७५८ दुर्मुख नाम संवत्सरे आषाढ शुद्ध १५ रोजीं सुमुहूर्तावर रामभाऊ पाठोदेकर यांस गादीवर स्थापन केलें. म्हणजे मठ संप्रदायाप्रमाणें सशास्त्र आपलीं भगवीं वस्त्रें, झोळी, कु-

वडी वगैरे त्यांस दिली. आणि सर्वत्रांस
विदित केलें कीं माझे प्रिय शिष्य राम-
भाऊ यांजला मी आपली गादी दिली
आहे तर यांजला आजपासून माझ्या
स्थानीं मानून संप्रदायानुरूप सर्वांनीं
यांजला मदत द्यावी. याप्रमाणें रामभा-
ऊंचा गादीवर बसण्याचा समारंभ झा-
ल्याबराबर बाहेर ठिकाणच्या ही मंडळी-
स समजण्याकरितां जागोजाग पत्रेंसु-
द्धां पाठविलीं. त्यांपैकीं बडोदे मुक्कामीं
व्यंकटराव घोरपडे अमीरु उमराव यां-
जकडे एक आषाढ वद्य ७ चें पत्र गेले-
लें अस्सल हातीं आलें त्यांत अशीं
अक्षरें आहेत कीं "येथील समस्त मं-
डळीच्या अनुमतें चिरंजीव रामभाऊस
संस्थान संप्रदायानुरूप दीक्षा देऊन
श्रीराममंदिर स्वाधीन केलें आणि येथी

ल रीतीप्रमाणें कोणी संस्थानास गृहस्थ अखत्यारी असावा जाणून तो भाऊ हरिश्चंद्रजी यांस अखत्यार दिला आहे."

मिळून रामभाऊंस आत्माराम महाराजांनीं जी आपली मालकी दिली ती गोष्ट सर्वत्र पसरली गेली व त्यापासून समस्त श्रोतृजनांस आनंदच झाला यांत संशय नाहीं. फक्त भाऊ रसूल यांस मात्र तें वैषम्य लागलें असें लोक दृष्टीस येऊं लागलें. तथापि त्यांजला, ही गोष्ट रुचली नसेल वमी केलेल्या कृत्यांत भाऊ कांहीं घोटाळा घालतील हें महाराजांच्या स्वप्नींही नव्हतें. परंतु आपल्या विषयीं भाऊंच्या मनांत आलेला कलंक रामभाऊंनीं जाणून एका वेळीं एकांतांत म-

हाराजांस विनंती केली कीं आपण सं-
स्थानचा अखत्यार भाऊसाहेबांस दि-
ला. पण एका मेणांत दोन सुऱ्या क-
शा राहतील. त्यावेळीं तर महाराजां-
नीं रामभाऊंस सांगितलें कीं भाऊक-
डून तुजला तिळभरही त्रास होणार
नाहीं. असें त्यावेळीं बोलले खरे पण
भाऊंच्या वर्तनांत फेर पडत चालल्या-
चें त्यांच्याही दृष्टीस आल्यावरून सं-
शय आला आणि एक दिवस राजश्री
बाबा बाके यांस भाऊ रसूलकडे पाठ-
वून कळविलें कीं संस्थानांत आतां
रामभाऊ स्थापन झाले आहेत ते-
व्हां पूर्वी आपणाकडे दिलेल्या सोंप-
पूकीचा कार्यभाग झाला हें जाणून
संस्थानच्या सनदा वगैरे कागदपत्र जे
आपणापाशीं दिले आहेत ते संस्था-

नांत राहण्याकरितां पाठवावे. या महाराजांच्या निरोपास भाऊ नाहीं तर म्हणत ना पण उद्यां देतों, परवां देतों अशा प्रकारें चालवून भाऊ रसूलनी कागद बाहेर काढले नाहींत. तरी ही आत्माराम महाराजांचें मन स्वच्छ असल्यामुळें भाऊ रसूल पासून पुढें आपल्या वंशाचा समूल घात होईल इतकें त्यांच्या ध्यानांत आलें नाहीं. आणि दिवसें दिवस प्रकृतिही जास्त बिघडत चालल्यामुळें त्यांचें लक्ष्य सर्व परलोक साधनाकडे लागलें. अखेरीस फार च यातना होऊं लागल्या म्हणून श्रावण वद्य ५ साल मजकूर रोजीं महाराजांनीं चतुर्थाश्रम घेतला आणि तिसऱ्याच दिवशीं म्हणजे श्रावण वद्य ७ सच समाधिस्थ झाले. हा महाराजां-

चा वियोग रामभाऊंस तर शोकप्रद होईलच कारण त्यांचें तें एक छत्रच होतें पण संस्थानच्या सर्व शिष्यवर्गा स ही तें दुःख फारच दुःसह झालें त- थापि रामभाऊ संस्थानास मालक झाल्याकारणानें व त्यांचा स्वभावही लोकप्रिय तसाच खर्चीक असा मंड- ळीच्या दृष्टीस आल्यावरून मंडळींनीं मनाचें समाधान करून घेतलें. आणि रामभाऊनीही पुढें धैर्य धरून महारा- जांचें उत्तरकार्य फारच थाटानें केलें, इ- तकेंच नव्हे तर संस्थानचीं नित्य नैमि- त्तिक कृत्यें अगदीं पूर्वीप्रमाणें चालू ठेविलीं.

याप्रमाणें एक वर्षपर्यंत निर्विघ्नपणा- नें काम चालल्या नंतर भाऊ रसूलनीं कलहास आरंभ केला. म्हणजे प्रथम

त्यांनी रामभाऊंपाशीं संस्थानच्या ज-
मारवर्चाचा हिशेब मागीतला. रामभाऊ
म्हणाले कीं तुह्मी हिशेब कोणत्या संबं-
धानें मागता? ते म्हणाले, आह्माला आ-
त्मारामबावांनीं अरवत्यार दिला आहे,
त्या संबंधानें मागतों. रामभाऊ म्हणा-
ले आपणास अरवत्यार कोणता व
कशाकरितां दिला आहे हें सर्व आ-
म्हास माहित आहे. आमच्या कडून हु-
कुमतीनें हिशेब देणें व्हावयाचें नाहीं.
कदाचित् तुम्ही संस्थानचे शिष्य म्हणू-
न पाहणार असलेत तर सुरवरूप पहा.
हें ऐकून भाऊ रसूल यांनीं प्रश्न केला
कीं, तुह्माला आमच्या आज्ञेनें चाल-
णें आहे कीं नाहीं. रामभाऊंनीं साफ
सांगितलें कीं आमच्या संस्थानचाच
संप्रदाय दुसऱ्याचा हुकूम उठवण्याचा

नाहीं. हे शब्द कांनीं आल्यापासून भाऊ रसूल यांनीं रामभाऊंपाशीं प्रसिद्धपणें द्वेष चालविण्याचें काम सुरू केलें. व रामभाऊंचा पाडाव करण्याकरितां अनेक तऱ्हा चालू केल्या. परंतु तीं सर्व कृत्यें त्यांचीं निर्विघ्न चाललीं. याचें कारण ते श्रीमंतीच्या व अधिकाराच्या संबंधानें मोठ्याच योग्यतेस चढलेले असल्यामुळें त्यांच्या अंगीं कर्तुमकर्तुं समर्थता होती. व ते जें करतील अथवा बोलतील तें सर्वमान्य होत होतें. इतक्यांत शके १७६० सालचा रामनवमीचा उत्साह आला तेव्हां भाऊ रसूलनीं रामभाऊंस सांगून पाठविलें कीं रामनवमीचा उत्साह आम्हीं करूं आपणास तिकडे पाहण्याचें कारण नाहीं. हें ऐकिल्याबरोबर त्या दिवसा-

पासून रामभाऊ आपणास आत्मारामबावांकडून मिळालेल्या ताम्रमय श्रीरामपंचायतनांच्या मूर्तींचा वर्षाप्रमाणेंच जन्मोत्साह वेगळा करूं लागले.

भाऊ रसूल यांनीं उत्साहाचें काम पतकरलें परंतु सदर उत्साह भिक्षेवरच चालत असे म्हणून मंदिरचे पुजारी तात्याभट गणपुले यांजला भाऊ रसूल यांनीं भिक्षेस पाठविलें. आत्माराम बावांच्या शिष्यवर्गांना ही गोष्ट नापसंतच होती सबब कित्येकांनीं तर पुजाऱ्यांस स्पष्टच जबाब दिला कीं भाऊ रसूल हे जर आत्मारामबावांचे चिरंजीव बनले असतील तर त्यांनीं स्वतः झोळी घेऊन बाहेर पडावें म्हणजे भिक्षा घालण्याचा विचार करूं. मिळून भाऊचे कोणी आप्त मित्र असतील त्या-

नीं कांहीं घुजाऱ्यास दिलें असेल पं
तु सर्वांनीं रामभाऊंचाच सत्कार करून
त्यांच्या उत्साहासच मदत दिली.

एकंदरींत रामभाऊंच्या महत्वांत
कांहीं कमी पडेना आणि आपल्या
हातून संस्थान जमेना म्हणून भाऊ
रसूल अत्यंत चिंताक्रांत झाले. तथा
पि अभिमान सुटेना सबब एक दिवस
त्यांनीं असा विचार केला कीं, येथें
एक रामदासीच आणून ठेवावा म्हणजे
संस्थान चांगलें चालेल. बहुधा आ-
त्माराम महाराजांच्या शिष्यवर्गापैकीं
च मिळेल तर फार चांगलें. इतक्यांत
स्मरण झालें कीं अमदाबाद येथें भ-
द्रेंत एक आत्मारामबावांचेंच मंदिर
आहे त्या संस्थानांतही एक गोविंद
बावा यानांवाचे शिष्य आहेत. तेव्हां

त्यांजलाच बोलावून घ्यावें म्हणजे आपला पूर्ण कार्यभाग साधेल. हें सुचल्या बरोबर लागलेंच त्यांजला पत्र लिहून आणिलें आणि प्रथम बडोद्यास पाठवून वर्षासनें आपणास मिळण्या विषयीं खटपट चालविली. हें ऐकून रामभाऊनीही आपले कारकून दिनकर बाबाजी पाटणकर यांस बडोद्यास पाठविलें. तेव्हां उभयतांचा तेथें झगडा चालला. त्यांत गोविंदबावा यांनीं आत्मारामबावांकडून भाऊ रसूल यांस मिळालेलें अखत्यारपत्र दाखविलें. व भाऊ रसूलच्या आज्ञेनें मी मंदिरांत स्थापन झालों आहें वगैरे सांगितलें. दिनकर बाबाजी यांनीं विदित केलें कीं भाऊ रसूल यांस दिलेला अधिकार केवल रामभाऊंस गादीवर बसविण्या पुरता व त्यांजला म-

दत देण्यापुरताच होता तेव्हां या अ-
स्वत्यारानें आत्मारामबावांनीं रामभाऊं-
स स्वतः दिलेली मालकी दूर कशी हो-
ईल? त्यांतून रामभाऊंची गादीवर स्था-
पना यथाशास्त्र झाली आहे. तस्मात्
ते महाराजांचे साक्षात् पुत्रच समज-
लें पाहिजे.

सारांश बडोद्यास मोठा बखेडा पडून
कांहीं दिवस वर्षासनें मुळींच अनामत
राहिलीं आणि तेथें सर्वानुमतें असें ठ-
लें कीं रा. रा. बाळाजीपंत दादा यांच्या-
मार्फत श्रीमंत जगन्नाथ ऊर्फ नाना शं-
कर शेट यांजला पत्र पाठवावें. आणि
त्यांचें लिहून येईल त्यांस वर्षासनें द्या-
वीं. याप्रमाणें विचार होऊन त्यांजकडे
पत्र आल्यानंतर ठाकुरद्वारांत मोठी स-
भा होऊन सर्वांचा विचार असा झाला

कीं रामभाऊ यांस आत्माराम महारा-
जांनीं संप्रदायानुरूप संस्थानीं स्थापित
केलें आहे. तेव्हां रामभाऊंच्या विरुद्ध
कोणी चालल्यास तें अयोग्य समजलें
पाहिजे. या सभासदांच्या आज्ञायांचीं वे.
शा. सं. बाळशास्त्री जांभेकर यांजकडू-
न जागोजाग पत्रें ही रवाना झालीं त्याच
प्रमाणें बाळाजी पंत दादा यांच्या मार्फत
नाना शंकर शेट यांजकडूनही बडोद्यास
लिहून गेलें. त्यावरून संवत् १९०३ सा-
लापर्यंत एकंदर पडलेला सर्व बखेडा
मोडून श्रीमंत रावसाहेब गोपाळराव मै-
राळ यांजकडून असा ठराव झाला कीं,
ज्या अर्थीं रामभाऊ यांजला आत्मा-
राम बावानीं आपल्या गादीवर स्वतः
स्थापित केलें आहे त्या अर्थीं त्यांजला-
च वर्षासनें द्यावीं. असा निश्चय झा-

त्या वरोवर संवत् १९०४ सालापासून
वर्षासनें रामभाऊंकडे येऊं लागलीं.

सारांश- असा प्रकार झाल्यानंत
कोणीकडूनही रामभाऊंचा पाडाव कर
ण्याच्या कामीं भाऊ रसूलचा उपाय च
लेना तेव्हां मग जागोजाग रामभाऊंच्या
निंदा करण्यास आरंभ केला. कोठेंही ब
सलें तरी बुध्या रामभाऊंच्या गोष्टी का
ढून त्यांच्या घरीं स्त्रिया फार जमत अ
सतात. वगैरे वल्गना कराव्या व राम-
भाऊ देवळाच्या बाजूसच होते सबब
अनेक प्रकारें हरएक कामांत त्यांजला
छळीत जावें त्यामुळें एक दिवस रामभा
ऊस अशी उदासी आली कीं अशा
त्रासांत राहण्यापेक्षां आपण महायात्रे
स जावें. हें बरें. मनांत आल्याबरोबर सं
स्थानांतून तर तत्काल निघाले; पण

यात्रेच्या खर्चाची कांहीं सोय झाली पाहिजे म्हणून सांवदेवीस हरिश्चंद्र यादवजी यांच्या धर्मशाळेंत मुकाम केला. व दासनवमीचा उत्साह ही तेथेंच झाला. गावांत बातमी दाट फुटली कीं रामभाऊ भाऊरसूलच्या त्रासानें निघून गेले. मग काय विचारावें. त्यांच्या सर्व शिष्यमंडळांत कल्होळ होऊन जिकडे तिकडे बोलूं लागले कीं भाऊरसूल यांनीं मोठेपणास चढून अखेरीस चांगलेंच यश संपादन केलें. व आत्मारामबावांनीं यांजवर प्रेम ठेविलें, त्याचें तर आज पूर्णच सार्थक झालें. विद्वान् लोकही उघड बोलूं लागले कीं काय हो ? "राज्ञः प्रमत्तस्य नृगस्य शापतो द्विजस्य तिर्यक्त्वमथाह राघवः" असें रामगीतेंत आहे त्या मानावरून

म्हणजे लक्षावधी गोप्रदानें करणारा
नृगराजा महान् पुण्यवान् असतां पूर्वी
दान दिल्या पैकीं एकादि गाय पुन्हा दा
नांत आली आहे कीं काय इतकेंच पा
हण्याच्या कामीं त्याचा प्रमत्तपणा
झाल्याकारणानें जर त्याजला सर
ड्याचें जन्म प्राप्त झालें, तर या गुरु
द्रोहानें, मित्रद्वेषानें, विश्वासघातानें
व वृत्तिच्छेदानें भाऊ रसूल यांची द
शा काय होणार? हे शब्द भाऊ रसू
ल यांच्याही कानीं आल्याबरोबर त्यां
जलाही भीति उत्पन्न झाली कीं हे रा
मभाऊ यात्रेस गेले तर माझ्या क
पाळीं खरोखर अपयशाचा डाग ला
गणार. हें मनांत आणून आपला म
लब नर न सोडितां रामभाऊंकडे बा
बा बाक्के यांच्या मार्फत एक पत्र लिहून

पाठविलें कीं आपण महायात्रेस जा-
ण्याचें करूं नये. आत्माराम बावांच्या
मागें जरीं आपणामध्यें परस्पर कांहीं
वैषम्य आलें असलें तरी तें समोरास-
मोर होतें. आतां आपण गेल्यानें आ-
म्हांस बरें वाटणार नाहीं. त्यांतून उ-
त्साहही नजीक आला आहे. तो तुम-
च्या आमच्या समक्ष झाला पाहिजे.
(तें फाल्गुन वद्य १३ चें पत्र पुराव्या करि-
तां अद्याप कायम आहे.) सदर पत्र रा-
मभाऊंनीं वाचून तसेंच ठेविलें. दुसरें
राघोबा तात्या यांच्या मार्फत गेलें.
त्याचेंही रामभाऊंनीं उत्तर दिलें नाहीं.
कारण यात्रेचा बेत रहित करून पूर्व-
स्थितींत कांहीं बदल होण्या सारखा
त्या पत्रांतून अर्थ निघत नव्हता. शे-
वटीं रामभाऊ काशियात्रेस स्वारस जा-

पार हें भाऊ रसूल यांस समजल्याव
रून अपकीर्तीच्या भीतीनें वे. शा. सं
गाधरशास्त्री फडके व काशिनाथ मो
जी या उभयतांस बरोबर घेऊन ते फा
ल्गुन वद्य ३० रोजीं प्रातःकाळीं स्वतः
गांवदेवीस गेले. आणि मोठें प्रेम दा
वून रामभाऊंस विनंति केली कीं तुम
आमचा मध्यंतरीं जो कांहीं भिन्नभा
राहिला तो होणाऱ्या भवितव्याप्रमाणें
होऊन गेला. आतां झालेली गोष्ट त
माघारी येत नाहीं. पण अतःपर आप
पांत विषमभाव राहणार नाहीं. तुम्ही
परत येऊन आपलें संस्थान संभाळावें
आमच्याजवळ महाराजांनीं सनदा व
जे कागदपत्र दिले आहेत ते सर्व शोध
आपणाकडे पाठवितों. पण आपण
काशीस न जातां संस्थानीं परत येत

असें वचन द्या म्हणजे मी स्वस्थ होईन. शेवटीं रामभाऊंनी मोठ्याच्या वचनावर भरंवसा ठेवून घरीं परत येण्याचा विचार केला. इतक्यांत नाना शंकर शेट यांची ही स्वारी गेली त्यांचा तर रामभाऊंवर अंतर्बाह्यच शुद्धभाव होता त्यांनी ही सांगीतलें कीं आपण संस्थान सोडून जाऊं नये. पुढें होईल तसें पाहतां येईल. त्यांतून आज भाऊनींहि आपणापाशीं कलह न करण्याचें वचन दिलें आहे. हें एक बरेंच साधन झालें आहे. याप्रमाणें दोन्ही गृहस्थांच्या मनाचा कल पाहून व आत्माराम महाराजांचा हेतु पूर्ण करणें हाच आपला मुख्य स्वधर्म आहे हें जाणून सर्व कुटुंबासह त्याच दिवशीं सायंकाळीं संस्थानीं परत आले. नंतर त्या

वर्षींचा उत्साह एक विचारामुळें फार च मौजेचा झाला. त्या दिवसापासून भाऊ रसूल यांनीं बरेच दिवस रामभाऊंच्या विरुद्ध खटपट चालविण्याची बंद ठेविली असल्या कारणानें रामभाऊंनीं ही शिष्यवर्गांत खटपट करून सार्वजनिक भिक्षाद्रव्यानें देवाचा सभामंडप आत्माराम बावांची समाधी. देवालयाच्या मागील चाळ हीं कामें तयार केलीं. सदर कामें तयार करणारे कारागीर ही अद्याप विद्यमान आहेत.

नंतर शके १७७४ च्या ज्येष्ठ महिन्यांत रामभाऊंची अकस्मात् प्रकृति बिघडली व ती बरी होण्याचीं चिन्हेही दिसत ना. त्यावेळीं संस्थानचें सर्व लहान मोठें शिष्यमंडळ रामभाऊंच्या भेटीस येऊं लागलें. परंतु भाऊ रसूल मा

त्र येतना. हें जाणून रामभाऊंनीं भाऊ रसूलकडे धोंडभटजी माडखोलकर प्रभुमंडळीचे उपाध्याय यांस पाठवून कळविलें कीं आपण माझी प्रकृति फार बिघडली असून भेटीस येत नाहीं व आमच्या संस्थानचे दस्तऐवजी कागदही पाठवीत नाहीं. याचें कारण मनोमय साक्षित्वानें मीही समजलों. पण माझ्या पश्चात् माझ्या चिरंजिवाचा आपण छळ चालवाल तर हें शुद्ध स्त्रीकार्य आहे. आपल्या मनांत माझें कांहीं नुकसान करणें असेल, तर त्याचा स्फोट माझ्या समोरच व्हावा. मागाहून मला काळजी नको. असें कळविलें तथापि ते आले नाहींत; इतकेंच नव्हे तर ठाकुरद्वारीं दत्तजयंतीचा उत्साह भाऊ रसूलकडूनच होत असे त्या

करितां ते मार्गशीर्षपौर्णिमेस मंदिरां-
त आले असून व त्यावेळीं ही रामभा-
ऊंनीं बलाविलें तथापि त्यांच्या भेटीस
आले नाहींत. शेवटीं कालनियमा प्रमा-
णें शाके मजकुरीं मार्गशीर्ष वद्य १३ रो-
जीं रामभाऊ परलोकवासी झाले. ते-
व्हां आत्माराम महाराजांच्या निर्याणा-
च्या वेळेस जो दुःखप्रसंग रामभाऊंवर
गुदरला तोच यावेळीं त्यांचे पुत्र हरी
बावा यांजवर आला. हरीबावांचें त्या-
वेळीं वय सुमारें २२ वर्षांचें होतें. व
रामभाऊंचें निर्याणसमयीं वय सुमारें ४१
वर्षांचें होतें.

हरिबावांनीं गंभीर अंतःकरणानें वडि-
लाचें उत्तर कार्य वगैरे संप्रदाया प्रमाणें सु-
रू केलें. पण भाऊ रसूल यांचे संस्था-
नसंबंधानें साम दान भेद दंड रामभाऊं-

च्या गतदिवसापासूनच सुरू झाले. म्हणजे रामभाऊंच्या दाहकालीं भाऊ रसूलच्या प्रेमांतले गोपाळ शास्त्री स्वर्गे आणि धोंडभट माडखोलकर हे आले होते, ते हरिबावांस त्या वेळेसच बोलले कीं बावासाहेब, आपण रामभाऊ गेल्याचें अणुमात्र दुःख करूं नये आपणास भाऊ रसूल आहेतच त्यांच्या विचारें आपण वागत जाऊन आनंदानें दिवस न्यावे. हरिबावांनीं त्यावेळीं उत्तर दिलें नाहीं. म्हणून त्या दोघांनीं रोज हरिबावांस, येऊन उपदेश करावा, कीं तुम्ही भाऊ साहेबांच्या विचारानें वागलां म्हणजे तुह्मास कोणतेंच न्यून पडणार नाहीं. परंतु हरिबावांनीं उत्तर देण्याचें मुळींच बंद केलें होतें. शेवटीं भाऊ रसूल एकदा स्वतःही त्या उभयतांबरोबर आले आ-

णि मोठ्या वडीलपणाचा देखावा दाखवू
न समोर बसल्यानंतर शास्त्रीबावा बोल
ले कीं, बावा साहेब, रामभाऊ गेले अस
आपणास म्हणण्याचें मुळींच कारण
नाहीं. देवळांत राम आणि हे भाऊ मि
ळून आपले रामभाऊ कायमच आहेत.
त्यावरही हरिबावांनीं उत्तर दिलें नाहीं.
आणि ती उत्तर देण्याची वेळ ही नव्हती
सारांश तेरा दिवस पर्यंत प्रसंगा प्रसं
गानें त्यांचा सारखा उद्योग चालू होता
परंतु हरीबावांकडून उत्तर मिळालें नाहीं,
म्हणून भाऊसाहेबाच्या मनांत खुटखु
तच होतें. चवदावा दिवस उगवल्यावर
बर आमच्या आज्ञेनें हे वागतील किंवा
नाहीं याची चांचणी पाहण्या करितां
भाऊंनीं पूर्वी एक हुकूम पाठविला कीं
आपल्या मंदिरांत पूर्वी तात्या भटगण

पुळे या नांवाचे जे पुजारी होते त्यांजला रामभाऊंनीं काढलें होतें. पण आपण त्यांजला पूर्ववत् कायम करावें. हरिबावांनीं नम्रपणानींच सांगून पाठविलें कीं आपण जर रामभाऊंच्या प्रेमांतले म्हणविता तर त्यांनीं केलेल्या गोष्टीचा अभिमान आपणास असलाच पाहिजे. व त्यांजला ज्या प्रियाप्रिय गोष्टी होत्या त्या आपणास तशा झाल्याच पाहिजेत. आपली वागणूक तशी ठेवण्याचा आपला अखत्यार आहे पण माझ्या हातून तर वडिलांच्या कृत्यांचें उल्लंघन होणार नाहीं. हा निरोप भाऊ साहेबांनीं ऐकिल्याबराबर रागानें पुन्हा वरील दोन गृहस्थांस बोलावून त्यांजला सांगितलें कीं तुम्ही आज हरिबावांकडे जावें आणि आम्ही, तुमच्या विचारें वागत जाऊं

असें हरिबाचांपासून लेखी लिहून आ
णावें. ते दोघे आल्यावर त्यांनीं भाऊ-
साहेबांचा निरोप दर्शित करितांच हरि
बावांनीं सांगितलें कीं भाऊ साहेबांपा-
शीं आत्मारामबावांचाच लेख आहे अ-
सें ते म्हणतात मग माझ्या लेखाचें का-
रण काय? मजला आणखी लिहून दे-
ण्याचें कारण कांहींच दिसत नाहीं. हाही
निरोप त्या उभयतांनीं सांगितल्यावर भा-
ऊंच्या मनांत पक्कें वाटलें कीं हे हरिबा-
वाही आम्हास रामभाऊ प्रमाणेंच जड
होणार. आपला हुकूम संस्थानावर रा-
हीलसा वाटत नाहीं. हरिबावांनीं त्यां-
च्या राजीनाराजीकडे विशेष लक्ष्य न पु-
रवितां माघमासांत दासनवमीचा व चै-
त्रांत रामनवमीचा असे पूर्व संप्रदायाप्र-
माणें उत्तम प्रकारें उत्साह केले. पुढें ए-

क दिवस आह्मास दत्ताच्या मूर्ति ब-सविण्याचा विचार करणें आहे असें निमित्त प्रसिद्ध करून भाऊंनीं आपले घरीं सर्व ब्रम्हवृंद बोलाविलें. आणि गंगाधर शास्त्री फडके प्रभृतींचे पूर्वीं एकांतीं कान भरून त्यांजला सांगीतलें कीं, तुम्ही हरिबावांस येथें बोलावून त्यांजला समजूत द्या आणि आमचे विचारें ते वर्ततील असें करा. नाहीं तर त्यांचें खचित नुकसान होईल. कशाही प्रयत्नानें हरिबावांकडून आज मजला लेख लिहून देववा. शास्त्रीबावांनीं बहुधा विडा उचलूनच हरिबावांस त्या सभेंत बलावणें पाठविलें. हरिबावांच्या मनांत जावयाचें नव्हतेंच पण उन्मत्तपणा दिसतो म्हणून गेले. जाऊन बसल्यावरोबर भाऊ साहेबांच्या सूचनेप्रमाणें गं-

गाधर शास्त्रीबावांचा प्रथम हाच प्रश्न कीं संस्थानच्या संबंधानें भाऊसाहेब सांगतात तसें तुम्हीं लिहून कां देत नाहीं. हरिबावांचें एकच उत्तर कीं आत्मारामबावांचा लेख आहे म्हणता मग माझ्या लेखाचें काम काय. शास्त्रीबावांनीं पुन्हा सांगितलें कीं हरिबावा, आपल्या कल्याणाची आम्हास इच्छा आहे. म्हणून हात जोडून मागणें मागतों कीं भाऊसाहेब आपले हितचिंतक समजून ते मागतील तसें लिहून द्या. आणि त्यांच्या आज्ञेनें वर्तजा. हरिबावा सर्व ऐकून बोलले कीं आपण जें कराल तें सर्व माझ्या हिताचेंच कराल पण मागतील तसें लिहून देण्यानें जर माझें नुकसान नाहीं असा आपण उपदेश करितां तर जगन्नाथ शंकर शेट यांजपासून

ही त्यांची इष्टेट मला लिहून देववा. त्यां-
नीं मला लिहून दिली तर मी हि भाऊं-
स लिहून देईन. तें वर्मी बोलणें पडल्या
बरोबर शास्त्रीबावा चिडले. आणि म-
ग अद्वा तद्वा बोलूं लागले कीं अशा
गुणांनीं तुमच्या हातीं नरोटी येईल.
अशा प्रकारें त्यांच्या तोंडांतून बरींच
दुर्वाक्यें निघालीं तरी हरीबावा क्रोध-
वश झाले नाहींत. शांतपणानें त्यांनीं
इतकें मात्र सांगितलें कीं शास्त्रीबावा,
आपण मला ही क्रोध करा पण माझी
एकवार हकीगत ऐकून तरी घ्या. शा-
स्त्रीबावा म्हणाले बरें बोलाबोला. नि-
घूंद्या एकदा कायतें. हरीबावा म्हणाले,
शास्त्रीबावा माझी स्वतःची इच्छा वि-
चाराल तर माझ्या मनांत एक अक्षर
सुद्धां भाऊंस लिहून द्यावें असें येत

नाहीं. कारण भाऊ साहेबानीं फार दि-
सांपासून आमच्यापाशीं दीर्घद्वेष
चालविला आहे तथापि जर तुमचा स-
र्व ब्रम्हवृंदांचा मजवर कोपच होत अस-
ल तर मी थोडें लिहून देईन. पण भा
साहेबांनीं ही माझें कांहीं कबूल केलें
पाहिजे. मग शास्त्रीबावांस जरा बरें वा-
टून त्यांनीं भाऊ रसूल यांस सभेंत ब-
लावून सांगितलें कीं, भाऊ साहेब हे
हरिबावा काय म्हणतात तें ऐका. हरि
बावा म्हणाले मला जें सांगणें तें मी
त्यांस एकांतांत सांगेन. हें ऐकतांच
भाऊ साहेब हरिबावांस घेऊन एकांतां
त गेले. तेथें हंसत हंसत हरिबावा म्ह-
णाले कीं आज आपण युक्ति चांगली
काढली. सर्व ब्राम्हण आपल्याकडील
झाले म्हणजे मजला मागाल तसें लि-

हून देणेंच भाग आहे. पण आपण मज-
पाशीं आतां काय लिहून मागता तें मा-
त्रे एकवार स्वतः सांगा. तें म्हणाले कीं
संस्थान तुमचें आहे. व त्या संबंधीं
सर्व उत्पन्न तुह्मास देत जाऊं. आणि
तुम्ही कराल तें आह्मास मान्य होत
जाईल, असें स्पष्ट लिहून द्या.

हे शब्द ऐकिल्याबरोबर हरिबावांस
थाईट वाटून पुन्हां बोलले कीं भाऊ
साहेब? आत्मारामबावांनीं लिहून दि-
लें आहे ह्मणता मग माझ्या लेखाचें
महत्व काय. आपला माझा आप-
सांत द्वेष उत्पन्न न होईल अशी आ-
पण तजवीज ठेवा. म्हणजे झालें. या
बोलण्यावर तर फारच क्रोधाविष्ट होऊ-
न भाऊ बोलले कीं असल्या पोरचे-
ष्टा उपयोगी नाहींत. सांगतों तसें लि-

हून देणें असेल तर बसा. नाहीं तर घ. रीं जा. हें त्याचे बोलणें फारच चिडीस यावयाचें; परंतु हरिबावांनीं समय पा. हून आग्रहाची थोडी माघार घेतली. आणि पुन्हा ते म्हणाले कीं भाऊ साहेब, आपणास राग येत असेल तर मी श्रीरा ममंदिराच्या संबंधानें म्हणाल तसें लि. हून देतों परंतु आत्मारामबाबांची स. माधि, चाळी वगैरे इस्टेट आणि भिक्षा वगैरेची मिळकत, तसीच पूर्व संपादित चीज वस्त, कावेरीबाईनीं रामभाऊंस बक्षीस दिलेली जागा व रामभाऊंनीं बां. धलेला सभामंडप याचा मात्र त्या ले. खांत संबंध नसावा. भाऊंचा आग्रह तर शिखरासच चढलेला होता ते तसें तरी कोठून ऐकतात. लागलेच म्हणाले कीं जें उत्पन्न होईल तें तुमचें. तुम्ही

सांगाल तसा खर्च करीत जाऊं. तुम-
च्या आज्ञेबाहेर वर्तन करणार नाहीं. क-
रीन तर तुम्ही सांगाल त्या शिक्षेस पात्र
होईन. असेंच लिहून दिलें पाहिजे. अ-
खेरीस हरिबावा म्हणाले कीं चाळीवर
तरी माझी सत्ता आहे कीं नाहीं. भाऊ
म्हणाले चाळींतील एका खोलीवर सु-
द्धां तुमची सत्ता राहणार नाहीं यापुढें
तुम्ही काय म्हणतां? इतकें बोलणें चा-
ललें असतां इतक्यांत सभेंतून फडके
शास्त्रीबावांचा निरोप आला कीं, तुम-
चा एकांत लांबला; पण आमच्या अं-
ताची वेळ आली. तर आतां तरी पुरे
करा. शेवटीं भाऊ हरिबावांस म्हणाले,
एकच जबाब सांगा. तुम्ही लिहून देता
कीं नाहीं? हरिबावा म्हणाले ज्या अ-
र्थीं आपल्या मनांत विपरीत भाव आहे

त्या अर्थीं मी एक अक्षर सुद्धां लि-
हून देणार नाहीं. मग जें प्रारब्धीं अ-
सेल तें होईल. अखेरीस भाऊसाहेब
रागावले आणि सभा विसर्जन झाली.
हा समारंभ शके १७७५ श्रावणवद्य ६
रोजीं झाला. व त्या सभेंत असणाऱ्या
मंडळी पैकीं हरिभक्त विनायक बावा सा-
तारकर हे अद्याप विद्यमान आहेत. नं-
तर दुसऱ्याच दिवशीं आत्माराम बावां-
ची पुण्यतिथि आली त्या दिवशीं भाऊ
रसूल यांनीं मुध्या हटानें त्रिंबक बावा
नाशिककर यांचें कीर्तन केलें. आराध-
ना मात्र हरिबावांच्या हातानें झाली.
त्या दिवसापासून हें प्रकरण फारच
पेटत जाऊन भाऊसाहेब यांनीं सर्वसा-
[illegible] तयारी करून सुप्रीम कोर्टांत
[illegible] केली कीं हें संस्थान आमचें

असून व आमची येथें वहिवाटही चालू असतां आम्ही संस्थानांत नेमलेल्या पुजाऱ्यांपैकीं हरिबावा हे आमच्या विचारें वागत नाहींत सबब यांजला काढण्याचा हुकूम व्हावा. त्यावरून हरिबावांस समानही लागलें. तेव्हां हरिबावांच्या मनास विरक्ति होऊन त्यांनीं असें ठरविलें कीं हें संस्थान ही नको आणि हा त्रासही नको. कोठें तरी स्थलांतरच करून रहावें. असा मनाचा निश्चय करीत आहेत तों असेंही सुचलें कीं एकवार नाना शंकर शेट यांजला तरी हा मजकूर कळवावा. मनांत आल्याबरोबर त्यांजकडे गेले व तें समान पुढें ठेऊन मी आतां संस्थानांतून निघून जातों, वगैरे त्यांजला श्रुत केलें. नानाशेट मोठे विचारी. व यांच्यापाशीं निष्कपट वागणारे

होते सबब त्यांनीं सांगितलें कीं संस्था
नांतून निघण्याची एकदम उतावळी करू
नका. संस्थान जमविण्यास फार दिवस
लागतात. आपले वडील रामभाऊ यां
जलाच कष्ट किती लागलेते आम्हास
ठावूक आहेत. आतां सरकार दिवाणी-
चा प्रसंग येणार खरा पण येऊं द्या. मी
तुमची सर्व व्यवस्था लाऊन देतों. मग
शिवदास मोहनजी आणि मोरोबा दामोद-
रजी याकर आणि बोन वकील यांचे कुल-
र्क या उभयतांस त्यांनीं बोलाऊन सां-
गीतलें कीं तुह्मी या हरिबावांची नीट के-
स पाहून ती काळजीनें चालवा. पुढें
केस चालूही झाली. पण हरिबावांचा
कारखाना रामदासी. रोज वकीलांकडे
जातो कोण आणि त्यांजला कमीजा-
स्त पुरावा काय पाहिजे तो विचारतो की

ण. त्यांतून भाऊ रसूल यांचे सर्व स्ने-
हीच. मुकद्दमा निघाला तेव्हां हरिबावां-
च्या जबानीच्या वेळेस त्यांजला जज्जां-
चा इतकाच प्रश्न झाला कीं तुम्हीं भाऊ-
रसूल यांस लिहून देता किंवा नाहीं? ह-
रिबावा म्हणाले नाहीं. इतक्याच जबानी-
वर इंग्रजी भाषेंत कोर्टांत कांहीं चर्चा हो-
ऊन भाऊ रसूलच्या तर्फे निवाडा झाला.
मग भाऊंनीं कोणते दस्तऐवज पुराव्या-
स पुढें केले आणि जज्जांचें मन आप-
णाकडे कसें वळविलें तें ईश्वरासच ठा-
ऊक. भाऊ रसूल यांनीं एकदम एकस-
रकारी मनुष्य देवळांत आणून हरिबा-
वांस देवळांतून काढून दिले. पुढें याबद्द-
ल अपील करतो कोण? आणि निवा-
ड्याचें कागदपत्र पाहतो कोण? हरिबा-
वांनीं त्या दिवसापासून त्या संस्थानचें

मुळींच नांव सोडून देवळाच्या बाजूस जी त्यांची पित्रार्जित चाळ होती त्यांत ते जाऊन राहिले. आणि विद्यार्थीमंडळापैकीं जे सच्छिष्य होते त्यांजपासून भिक्षा द्रव्य मिळवून युक्तिप्रयुक्तीनें नवीन मंदिर ही बांधून पूर्ववत् संस्थान संप्रदायाप्रमाणें पूजा नैवेद्य उत्साह, ब्राम्हणभोजनादि सर्व कृत्यें चालवूं लागले. ही गोष्ट सुमारें शके १७७५ ची असावी.

आतां हे हरिबावा सांप्रत कायम असल्यामुळें यांचें कांहीं वर्णन करणें म्हणजे थोडी मुखस्तुति दिसेल खरी. पण सद्वृत्तशाली पुरुषास यथाशक्ति मदत करावी असें कोणा वाचकाच्या मनांत आलें तर त्यांजला त्यांची योग्यता कळावी म्हणून थोडा त्यांचा ही

इतिहास लिहितों. हे चाळीत आल्यास सुमारें सत्तीस (३७) वर्षें झालीं. त्यावेळीं यांजवळ द्रव्यसंग्रह मुळींच नव्हता. पण त्यांनीं धीर न सोडितां हळू हळू राममंदिर ही पक्कें बांधून देवाच्या राजोपचाराचें सर्व सामान घरचें तयार केलें. व प्रतिवर्षी ते रामनवमीचा उत्साह दहा दिवस फारच डौलदार करित असतात. खेरीज मध्यंतरीं आत्मारामबावांची पुण्यतिथि व दासनवमी हे तीन तीन दिवसाचे उत्साह आहेत. व. सारांश या सततीस वर्षांत त्यांच्या हातानें हजारों रुपयांचीं सत्कृत्यें घडलीं. यांच्या वचनाची अशी ख्याति आहे कीं, हे जें तोंडानें कबूल करतील तें रजिष्टरापेक्षां ही जास्त किंमतीचें लोक समजतात. आचरणाच्या कामीं तर को-

णी दुष्टही यांची निंदा करणार नाहीं. परस्त्री माते समान हा मूर्तिमान् शब्द यांच्या जवळ नमुना पाहण्या सारख्या आहे. सांप्रत यांचे चिरंजीव दोन असू न तेही सद्वळणांतच आहेत. सांप्रत हरिबावांचा वृद्धापकाळ आला आहे; परंतु जर कोणास त्या सत्पुरुषाचें दर्शन घ्यावें असें वाटेल, तर त्याजला विशेष परिश्रम नाहींत. ते आपल्या रामसंस्थानांतच अक्षय सोवळ्यांत बसलेले असतात. कोणी आल्यास त्यांजवळ प्रेमानें संभाषण करितात. असो या सत्पुरुषांच्या घराण्याचा जो मी इतिहास लिहिला, याचा मुख्य उद्देश वरील सूचनेवरून वाचकांच्या ध्यानांत येईलच; परंतु "आदरात् द्विरुक्तिः" या न्यायानें पुन्हा श्रुत करितों कीं, जर सर्वांनीं हा अ

न्याय झाला म्हणून बोभाटा केला तर अद्याप बडोदें संस्थानांतून वर्षासन चालू आहे तें तरी ज्याचें त्यास मिळण्याचा संभव आहे. सांप्रत बडोदसंस्थानचे महाराज अति सूज्ञ व विद्वान् असल्या कारणानें त्यांच्या कानापर्यंत ही गोष्ट गेली तर कार्यभाग होण्यास क्षणभरहि वेळ लागणार नाहीं. कारण तेथील रु० वर्षासनरवातीं पडत असूनही तूर्त संपादकाच्या वंशास मिळत नाहीं. दुसरी गोष्ट- तें संस्थान ही अद्याप हरिबावांच्या हातांत घेण्याचा असा मुद्दा दिसतो कीं, हें संस्थान आत्माराम बावांनीं स्वतःच्या परिश्रमानें केवल भिक्षेवरच तयार केलें आहे. तेव्हां याची मालकी फक्त आत्मारामबावांचीच्च असून सार्वजनिक द्रव्यानें हें काम झालें अस-

त्यामुळें हरिबावांस त्या मंदिरांतून काढून देण्याचा अधिकार कोणास पोंचणार नाहीं. व भाऊरसूल यांस संस्थानची व्यवस्था पाहण्याचा जरी आत्मारामबावांनीं अधिकार दिला असला तरी सार्वजनिक मिळतीचे भाऊरसूल हे मालक होणार नाहींत. अथवा सार्वजनिक भिक्षा द्रव्यानें मिळविलेल्या इष्टेटीची मालकी संपादकाच्या वंशाशिवाय दुसऱ्यास मिळणार नाहीं. त्यांतून सांप्रत भाऊरसूल यांजकडून त्या देवस्थानांत पूजा नैवेद्यादिकां करितां ज्या गृहस्थांची नेमणूक झाली आहे ते गृहस्थ आत्मारामबावांच्या जातीचे नसून रामदास सांप्रदायी ही नाहींत; इतकेंच नव्हे तर नवीन अकुलकोटी गुरुसंप्रदायाचे दिसतात. हा प्रकार सर्व उघडच दिसत आहे.

परंतु हरिबावा त्या ठिकाणांतून सुमारें सत्तीस वर्षें बाहेर पडले आहेत व अनेक त्रासामुळें आजपर्यंत त्यांनी या कामीं उद्योग ही केला नाहीं. तेव्हां आतां सांप्रतच्या कायद्याच्या आधारें हें संस्थान हरिबावांच्या ताब्यांत जाण्यास कांहीं मार्ग आहे कीं नाहीं हाच मुख्यत्वें करून विषय वाचकांपुढें मांडावयाचा आहे. सबब हरिबावा हे आत्मारामबावांचे निःसंशय वंशीयच आहेत, या विषयींचा प्रथम पुरावा दर्शित करितों.

## संमती पत्र नंबर १.

शके १७९० विभवनामसंवत्सरीं मुंबईंतच आत्मारामबावांचे पौत्र हरिबावा यांनीं या संस्थानच्या संबंधानें आपणास माहिती काय आहे व या संस्थानचे मालक आपण कोणास समजता

असा कित्येकांस प्रश्न केला होता, त्याचें उत्तर जें खालीं सह्या करणारां-कडून मिळालें तें येणें प्रमाणें:-

श्रीगुरु आत्मारामबावा महाराज यां-नीं आपल्या देहावसानीं तुमचे तीर्थ रूप रामभाऊ यांजला आणवून त्यां-स संप्रदायानुरूप अनुग्रह व पट्टशि-ष्यत्व देऊन आपला सर्व अधिकार त्यांजला दिला. आणि त्यांचें देहावसा-न झाल्यामागें त्यांचें पारत्रिक कृत्य रामभाऊ यांनीं करून संस्थानांत अ-धिकारी असताना भिक्षा मागून सं-स्थानचा सभामंडप व त्याच सभामंड पांत श्रीरामजीच्या समोरच घोटीव पा षाण निर्मित आत्माराम बावांची समा-धि बांधली व जीवमानपर्यंत संस्थान च्या अधिकारानें वहिवाट ही केली या

वरून रामभाऊ यांस आम्ही सर्व लोक आत्माराम बाबा यांच्या ठिकाणीं मानीत असून त्या सिद्ध सत्पुरुषाची सेवा जी कांहीं स्वहितार्थ करावयाची ती त्यांच्या संप्रदायानुसार त्यांनीं आपल्या संस्थानीं रामभाऊ यांस सच्छिष्य जाणून स्थापित केल्यामुळें त्यांस साक्षात् पुत्रवत् मानून व तद्द्वारा यांची पूजा करणें शास्त्रतः योग्य आहे, असें ही समजून रामभाऊ यांचीच करीत होतों. संस्थानच्या सहाय्या करितां सेवा द्रव्य ही शक्त्यनुसार वारंवार देत आलों. त्यानंतर प्रस्तुत आपण हरिबावा रामभाऊंचे चिरंजीव हे आत्माराम बावांचे नातू असें समजून यथाशक्ति द्रव्यादि द्वारा सेवा करणें ती आपलीच करीत आहों. यावरून सर्व या संस्थान संबंधीं

अधिकार आपणाकडेसच आहे. या प्रमाणें हकीगत आह्मांस ठाऊक आहे. मिती चैत्रशुद्ध १ बुधवार.

१ त्र्यंकोबा धोंडभट माडखोळकर.
१ बाळशास्त्री मोडक नाशिककर.
१ गोविंद सखारामबाबा गुर्जर चौलकर.
१ बाळाजी विठ्ठल गोरे.
१ रामकृष्ण नारायण.
१ काशिनाथ धोंडदेव गुर्जर पाध्ये.
१ रामकृष्ण महेश्वर जडये.
१ रघुनाथ मुकुंद.
१ गणेशशास्त्री नेने.
१ दाजी सदाशिवशा० फाळके त्र्यंबककर.
१ पांडुरंग दयाळ भातखंडे.
१ श्रीधरभट लाळित रा० विजयदुर्ग.
१ पांडुरंग शिवराम भावे अनुष्ठानी.
१ नरसिंहशा० गोविंदशास्त्री साठे वाईकर.

१ रामचंद्र शामराव केळकर.
१ पांडुरंग रामचंद्र शास्त्री पुरोहित.
१ माधवराव बिन बापू पंडित हरिपुरकर.
१ माधव राव वासुदेव मोने जि० रत्नागिरी
१ विश्वेश्वर सदाशिव छत्रे.
१ त्रिंबक केशव वैद्य.
१ गोविंद कृष्ण भट नाखे.
१ विश्वनाथ बहिरव सहस्त्रबुद्धे.
१ त्रिंबक केशव भट पेणसे.
१ सदाशिव शिवराम.
१ गोविंद भट बिन भिकंभट लिखिते.
१ विष्णुभट बिन सदाशिव भट.
१ सखाराम भास्कर भट जायदे.
१ नारो कृष्ण हुमाळे.
१ नारायण पं० बिं० बापू पंडित वेंगुरलेकर.
१ नारायणशा० बिन विश्वनाथशा० पुराणिक.
१ सदाशिव अनंत शास्त्री लेले त्र्यंबककर.

१ महादेव शास्त्री धर्माधिकारी रेवदंडेकर.

१ तात्या गोविंद शास्त्री खेडकर नाशीक.

१ गोविंद अनंत शास्त्री लेले त्र्यंबककर

१ बाळकृष्ण अमृत निपुणगे नाशीकक-
र ऊर्फ अप्पा गोसावी.

१ मोरो त्र्यंबक जोशी नाशिककर.

१ बाळंभट बिन केशवभट महाजन.

१ कृष्णशास्त्री गोरे.

१ लक्ष्मणशास्त्री जांभेकर मु० पोंभुर्ले.

१ विठ्ठल बावा मिरजोळकर.

१ रामचंद्र निळकंठ जोशी पिंपळवंडीक

१ महादाजी विठ्ठल.

१ गणपतराव नारायण परांजपे.

१ जनार्दन बावा बिन जगन्नाथबावा
सं० नारगांव.

१ यज्ञेश्वर लक्ष्मण पाध्ये गोळवलकर

१ गोविंदराव भिकाजी पटवर्धन खोत.

१ विनायक त्रिंबक गोसावी सातारकर.

१ सदाशिव शिवराम भावे.

१ वामन बापूभट खादले नेरुरकर.

१ रावजी पांडुरंग तपस्वी.

१ मोरो जयराम धामणकर.

१ बाळंभट भिकंभट मोडक.

१ विठ्ठल बल्लाळ खरे.

१ भाऊ गोपाळ भावे चिपळूणकर.

१ आपाशास्त्री खाडीलकर नाशिक.

१ रामकृष्ण हरी भागवत.

५६

## संमती पत्र नंबर २

हरिभक्त हरिबाबा रामदासी यांच्या आमंत्रणावरून मिती आषाढ वद्य १४ शके १८०७ रोजीं सुमारें २०० मंडळी हरिबावांच्या राममंदिरांत जमली होती. त्या वेळीं हरिबावांनीं मंडळीस प्रश्न के-

ला कीं आत्मारामबावांच्या ठाकुरद्वारावर व तत्संबंधीं मालमत्तेवर माझा वारस्याचा हक्क आहे कीं नाहीं हें माझे कागदपत्र पाहून सांगावें. त्यावरून तेथें कागदपत्र वाचलेही गेले. परंतु त्यावेळीं एकदम निर्णय होईना म्हणून सर्व मंडळींनीं त्या कामीं आपल्यातर्फें अक्का पंच नेमून सभाविसर्जन केली. नंतर श्रावण शु० १२ रोजीं पुन्हा अक्का पंचांनीं सभा भरविली त्यासभेंत सर्व कागदपत्र पाहून अक्का पंचांनीं ठरविलें कीं, ज्या अर्थीं आत्मारामबावांनीं सर्व जातीच्या भिक्षेनें हें मंदिर बांधिलें आहे. व त्यांनीं रामभाऊस आपल्या हातानें गादीवर स्थापन करून संस्थानची सर्व मिळकत त्यांच्या हवालीं केली आहे त्या

अर्थी त्यांचे पुत्र हरिबाबा हेच यासंस्थानचे मालक आहेत. व त्यांच्या सर्व मालमत्तेवर त्यांचा हक्क आहे यांत संशय नाहीं.

१ राजारामशास्त्री बोडस.
१ शिवराम नानाजी देशपांडे रामदासी
१ गोविंद शंकर शास्त्री बापट.
१ महादाजी वासुदेव पेणसे.
१ यशवंत वासुदेव अठल्ये.
१ अप्पाजी पांडुरंग करंजीकर.
१ नारायण विश्राम दळवी.
१ विठोबा कृष्णराव
१ माधवराव जगन्नाथजी.
१ नारायण बाप्सोबा धुमे
१ सदानंद त्रिंबकजी.

## संमती पत्र नंबर ३.

## मुंबईतील भाऊ रसूल यांच्या जातीच्या गृहस्थ मंडळीची संमति.

१ भाऊ रखमाजी.
१ कृष्णनाथ नारायणजी.
१ शिताराम बाळाजी.
१ नारायण गोविंदजी.
१ येशवंत राव विठोजी.
१ श्रीनिवास रामचंद्रजी.
१ माधवराय जगन्नाथजी. तळपदे.
१ पुरुषोत्तम बाळकृष्णजी.
१ हरिश्चंद्र नारायणजी.
१ वसंतराव राघोबा.
१ गणपतराव मोरोजी.
१ सदानंद विश्वनाथजी.
१ नारायण रामचंद्रजी.
१ हरिश्चंद्र रामचंद्रजी.

१ पांडुरंग रामचंद्र चिमणाजी नवलकर.

१ पुत्तोबा गणोबा.

१ आत्माराम शिवबा.

१ विश्वनाथ माधवजी.

१ सदानंद वेंकाजी.

१ वासुदेव रामचंद्र.

१ आत्माराम रामचंद्रजी.

१ एस्. व्ही. धुरंधर.

१ के. एस्. धुरंधर.

१ बाजीराव नात्यारावजी रणजित.

१ मोरोबा बाळकृष्णजी.

१ कृष्णराव भास्करजी.

१ रामचंद्र केशवजी.

१ विठ्ठलराव शामराव.

१ हरिश्चंद्र शामराव.

१ नारायण राघोबा.

१ जी. कृष्णराव.

३१

१ माणिकजी दामुलजी.
१ नारायण हरिश्चंद्रजी.
१ पांडुरंग शिवजी मेस्तरी.

३

## संमतीपत्र नंबर ४.

संस्थान बडोदें येथें हरिभक्त परायण भाऊ महाराज यांच्या निमंत्रणावरून श्रीलक्ष्मण महाराजांच्या मंदिरांत कार्तिक शु० १५ सं० १९४२ रोजीं सभा जमली होती, त्या दिवशीं सर्वांनीं हरिबावांस लिहून दिलें कीं आत्माराम बावा रामदासी मुंबई ठाकुरद्वारचे अधिकारी यांच्या गादीवर आपले वडील रामभाऊ रामदासी हे आत्मारामबावांच्याच हातून स्थापित झाले व त्यांच्या हातीं आत्मारामबावांनीं आपला सर्व अधिकार दिला त्यांच प्रमाणें आपण

" रामभाऊंचे औरस चिरंजीव आत्मारामबावांच्या सर्व मालकीचे हकदार आहांत असा आमचा पूर्ण अभिप्राय आहे."

१ बाळागोसावी (उर्फराजारामबावादाना-
१ राजारामकाशिनाथ शास्त्री. [ ध्यक्ष.)
१ बाबा दिक्षित पुराणीक सरकारी.
१ गोपाळबावागुरू बापूबावा ज्ञानमठ.
१ रामकृष्ण उपाध्ये.
१ सखाराम शास्त्री अलंकारी.
१ गंगाधर शास्त्री पराडकर.
१ रामकृष्ण हरि रामदासी सं० लक्ष्मण महाराज.
१ बाळंभट बिन यादवभटपुराणीक गरूड.
१ चिंतामण राव नारायण मुजुमदार.
१ भगवंतबावा बिन सितारामबावा दिंडोरकर.
१ अनंदराव लक्ष्मण ऊर्फ भाऊ खेडकर.

१ रामचंद्रराव जगताप.
१ बजाबा अमृतराव बोबा वणीकर.
१ खंडेराव शिवराम फुणशे.
१ पुरुषोत्तम गोविंदराव रोडे.
१ शास्त्री बद्रीनाथ त्र्यंबक नाथ.
१ गणेश नारायण फाटक.
१ नारायणराव माधव बक्षी अमदाबादकर
१ गंगाधर यादव गरुड.
१ अन्याबा गोसावी त्र्यंबककर.
१ रामचंद्रराव घोरपडे.
१ बाळकृष्ण गोविंद जोशी कोल्हापुरकर
१ चिमणराव काळे.
१ नारायण भट काळे आत्मारामबावाचे
१ विनायक भाऊ राजगुरु. [शिष्य
१ सदाशिव धोंडदेव घारपुरे.
१ माधवराव शेषाद्रि.

२८

शिवाय पृथक् आलेलीं संमतीपत्रें.

१ रा॰ सा॰ विश्वनाथनारायण मं॰ वकील हायकोर्ट.

१ आत्माराम शिताराम परभू.

१ वे॰ शा॰ सं॰ राजाराम शास्त्री बोडस महामहोपाध्याय.

१ गोविंद सखाराम गुर्जर.

१ गणेश महादेव कोशे माहिमकर.

१ शिताराम गणेश रहाळकर.

१ भिकंभट करमरकर अजरेकर.

१ रामचंद्र शामराव केसकर.

१ सखंभट शेंबेकर जंजिरा.

१ माधवराव भाऊ काळे.

१०

मिळून जर १३९ सभ्य लोकांचे स्व-
दस्तुरचे लेख आहेत व त्या लेखांत गु-
रुसंप्रदायाप्रमाणें शिष्य झालेले राम

भाऊ हे तारस शास्त्रोक्त असल्याब
द्दल जर राजाराम शास्त्रीबावा व राव
साहेब मंडलीक अशा जगमान्य पुरु-
षांचे लेख आहेत, तर रामभाऊंचे औ-
रसपुत्र हरीबावा हे ठाकुरद्वारचे मा-
लक ठरतील यांत शंका नाहीं. परंतु
आतां हरिबावांची वहिवाट फार दिवस
सुटली आहे तेव्हां कसें होईल याबद्द-
लची थोडी चर्चा करूं.

## या बद्दल एकंदर प्रश्न.

प्रथमचा प्रश्न हा कीं जरी हरिबावां-
स, भाऊ रसूल यांनीं आत्मारामबावां-
कडून मिळालेल्या अख्त्याराच्या जो-
रावर सरकार मार्फत मंदिरांतून काढिलें
आहे आणि या व्यवस्थेवर अपील न
होतां जरी सततीस वर्षें गुदरून गेलीं
आहेत तरी आत्मारामबावांच्या सं-

स्थानची अक्त्यारी गृहस्थांकडून अ-
व्यवस्था होऊं लागली तर पाहिजे ते-
व्हां हरिबावांस या कामीं हात घालतां
येईल कीं नाहीं. ?

उत्तर- एक खालीं सही करणारा
सुज्ञ गृहस्थ म्हणतो कीं, शंभर वर्षां-
नंतर ही हात घालतां येईल.

त्याचा स्वदस्तूरचा लेख.

दावा चालविण्याबद्दल वारसाच्या
हक्काविषयीं खालीं लिहिलेला कल-
कत्ता हायकोर्टाचा ठराव आहे.

मृत्युपत्र करून मरणारांनीं धर्मक्रि-
याकडे किंवा दानधर्माकडे आपल्या
संपत्तीचें ट्रस्ट केलें असेल व त्यांत
मरणाऱ्याच्या वारसांस फायदा नसेल,
र वारसांस ट्रस्ट नीटरीतीनें चालत
नाहींसा झाला तो नीट चालवावें असा

दावा करितां येईल.

इंडियन लॉ. रिपोर्ट वर्ष ५ वें कलकत्ता सिरीस पान ७०० पहा.

उपासक, पुजारी वगैरेंच्या हक्काबद्दल मुंबई हायकोर्टाचा ठराव.

देवस्थानां संबंधीं दावे सिव्हिल प्रोसिजर कोड १८७७ चा आक्ट १० वा कलम ५१०

देवस्थानांतील पुजारी किंवा उपासक यांस देवतेच्या फंडा संबंधीं किंवा मिळकती संबंधीं अथवा देवस्थानास लागून असलेल्या हरएक द्रव्यासंबंधीं अफरा तफर झाली असा दावा आणण्याचा हक्क आहे.

राधाबाई कोम चिमणाजी साळी.
विरुद्ध चिमणाजी बिन रामजी साळी.
इं. ला. रि. ३ मुंबई पान २७.

ता०२१मार्च १८८५ } आत्माराम शिताराम परभू.

प्रश्न दुसरा— आत्मारामबावांच्या संस्थानांत कांहीं मठसंप्रदाया विरुद्ध कामें होऊं लागल्यास या कामीं हरिभावांवांचून दुसऱ्याला हात घालण्याचा अधिकार पोंचेल किंवा नाहीं?

उत्तर— रावसाहेब मंडलीक यांच्या हातचा एक लेख आहे कीं, "वहिवाटदार यांनीं ब्राम्हणाशिवाय कोणी नेमिल्यास अथवा संप्रदाया बाहेर काम केल्यास देवळांत जाणारा कोणी ही रामभक्त फिर्याद करूं शकेल."

तारीख १३ माहे जून सन १८८०

प्रश्न तिसरा- संस्थान बडोदें येथून आत्मारामबावांनीं रु० दोनशेंचें वर्षासन संपादन केलें आहे. तें हल्लीं त्यांच्या वंशजांस न मिळतां ठाकुरद्वारांत जातें. तें आतां हरिबावांस उद्योगानें मिळेल किंवा नाहीं ?

उत्तर— बडोदसंस्थानांतील खालीं सही करणाऱ्या एका सभ्य गृहस्थाचा हरीबावांजवळ असा लेख आहे कीं, " बडोद्यांस जाऊन आपले प्रकरणाचा तपास करितां संवत् १९२३ तें संवत् १९३० पर्यंत यामहालीं रुपये २०० आत्मारामबावा रामजीमंदिर मुंबई म्हणून दरसाल खर्ची पडलेले आहेत. ही नेमणूक देवस्थानास नाहीं. आत्माराम बावा यांस खुद्दची आहे. जर देवस्थानास असती तर वर्षासनखातीं

खर्ची पडलेली नसती. तेव्हां ज्यांणी वर दर्शविलेले दरसालचे रु० घेतले त्यांणीं केवळ दगलबाजी केली असें होत आहे."

मिती चैत्र व० १३ } गोपाळ बल्लाळखरे
शके१८०७. } मु० देहगांव.

शिवाय हरिबावा यांचे वडील रामभाऊ आणि अखत्यारी भाऊ रसूल या उभयतांत जेव्हां कलह उत्पन्न होऊन उत्साह ही वेगळे होऊं लागले होते. त्यावेळीं कांहीं दिवस वर्षासनें मुळींच बंद राहून अखेर निकाल, श्रीमंत गोपाळराव मैराळ यांच्या मार्फत झाला. त्याबद्दल व पुढें रामभाऊंकडे वर्षासनें येऊं लागल्या बद्दल पाहिजे तितका मजबूद पुरावा आहे.

वर्षासन संबंधानें बडोद्यांहून राम-

चंद्र आत्माराम अथवा रामभाऊ अ
शा नांवानें आलेल्या पत्रांपैकीं पत्रें
ची टीप–

१ शिवराम बळवंत फुणशे यांचें पत्र संवत् १८९३ चें घोरपड्यांकडील वर्षासन पाठविल्याबद्दल.

२ माधवराव काळे यांचें पत्र संवत् १९०४ चें वर्षासन पाठविल्याबद्दल.

३ माधवराव काळे यांचें पत्र सं० १९०५ चें वर्षासन पाठविल्याबद्दल.

४ केशव गणपतराव काळे यांचें पत्र संवत् १९०६-७-८ चीं वर्षासनें पाठविल्याबद्दल.

५ बजूबाई घोरपडीचें पत्र संवत् १९२२ अखेरची बाकी पाठविल्याबद्दल.

६ माधवराव काळे यांचें पत्र मागील सालची पावती पाठवावी म्हणून.

७ माधवराव काळे यांचें पत्र दुष्काळामुळें तूर्त ऐवज पाठविण्यास सवड नाहीं.

८ भाऊ काळे यांचें पत्र ऐवज पाठवितों वगैरे.

१ व्यंकटराव घोरपडे यांचें पत्र.

सदर्हू वर्षासन [illegible] भाऊ कडून बंद करून भाऊ रसूल यांजकडे चालू करण्यास केवळ स्नेहसंबंधानें श्रीमंत ओझे कारभारी हेंच कारण आहेत. हरी

प्रश्न चवथा — ठाकुरद्वार संस्थानची मंदिर शिवायकरून बाकीची जागा ...का बाईची स्वतःच्या मालकीची हो... ती तिनें केवल रामभाऊ रामदा... ची हरीबाबांचे वडील यांसच बक्षी... ा दिली आहे. तें अस्सल बक्षीसपत्र ...र असेल आणि मध्यंतरीं जर ती

जागा त्यांच्याच आजाच्या अखत्या-
-याच्या ताब्यांत राहिली असेल तर
ती आतां हरिबावांस मिळूं शकेल कीं
नाहीं?

उत्तर- खालीं सही करणाऱ्या एका
गृहस्थाची संमति आहे कीं अखत्या-
री मनुष्याच्या ताब्यांतील मिळकत
पाहिजे तेव्हां घेतां येते.

मिति वैशाख शु० १ शके १८१३ — खंडोपंत लेले वकील पुणें.

प्रश्न पांचवा- रामभाऊ यांनीं आ-
त्मारामबावांची समाधि व सभामं-
डप स्वतः खर्च करून बांधिला आहे
तेव्हां त्याजवर त्यांची मालकी अ-
सावी किंवा नसावी?

प्रश्न ६ वा- वाडीसरकारांतून वेंगुर्लें
येथील महालक्ष्मी मिठागर तिरूसा

मबातेन अल्लफ चंद्र ७ माहे रमजान
र्जी आत्मारामबाबांस वंशपरंपरा
इनाम मिळालेला असून बरेच दिवस
ालत होता परंतु सुमारें चाळीस व-
ं जप्त आहे व त्याची चौकशी इंग्र-
सरकार मार्फत सन १८६९ सप्तेंबर
ता० १२ पर्यंत चालू राहून तुम्ही स्व-
ः आल्यावर हुकूम होणें तो होईल.
ा अखेर हुकूम आहे. तर आतां त्या
बद्दल कांहीं उपाय आहे कीं नाहीं ?
प्रश्न स्नातवा— आत्मारामबावा यां-
नीं भाऊरसूल यांस कांहीं अखत्या-
 लिहून दिला असला, तरी त्यांच्या
यतः बद्दलच्या लेखावर भाऊरसूल-
च्या वंशपरंपरेस त्या अखत्याराचा
हक्क पोंचेल कीं काय ? व आत्मारा-
बाबांच्या पुढील वंशीय पुरुषांस

भाऊरसूलच्या सर्ववारसांनीं ता-
ब्यांत वागवावें कीं काय?

या ७ प्रश्नांच्या संबंधेंजीं मतें व जे
पुरावे आहेत ते सर्व वाचकांपुढें ठे-
विले आहेत. तर याबाबतींत काय-
द्याच्या आधारानें कमीजास्त रस्ता
शोधून काढण्याची ज्याची जितकी
शक्ति असेल तितकी त्यानें परिश्र-
म घेऊन खर्च करण्यास तिळभरही
आळस करूं नये. कारण जीं परमा-
र्थाचीं महत्वाचीं कामें असतील,
त्यांत ही हें काम अग्रगण्य मानलें
जात आहे. या प्रकरणांत कांहीं अं-
शतः ही कोणा सद्गृहस्थाकडून आ-
त्मारामबावांच्या वंशीयांस फायदा
झाल्यास व हरीबावांची आत्माराम
बावांच्या समाधीशीं भेट झाल्यास

गोवत्स संयोग करून दिल्याचा त्या-
जला पुण्यांश आहे.

ज्यांस या संबंधानें परमार्थबुद्धी-
नें मतें कळविणें आहेत ते मुंबईयेथें
खालीं लिहिलेल्या पत्यावर पत्रद्वा-
रा कळविण्याची कृपा करतील व के-
वल मतें मिळविण्याकरितांच जर
मोठ्या खर्चानें हीं पुस्तकें आम्हीं छा-
पिलीं आहेत तर या कामीं तिकिटा
करितां अर्धा आणा खर्च झाल्यास
ही ते आनंदानें खर्च करतील अ-
शी आम्ही आशा करितों. हीं पुस्त-
कें पोंचल्यापासून दोन महिन्याच्या
आंत मात्र मतें पाठविण्याची मेहेरबा-
नी व्हावी. कारण पंचमुखी परमेश्व-
रानें कांहीं रस्ता दाखविला तर पुढें म-
जल चालण्यास ठीक पडेल. कदाचित्

कोणी कांहीं या संबंधानें मतें वर्तमानपत्रांतही प्रसिद्ध केल्यास त्याची ही एक प्रत मेहेरबानीनें पाठविण्यांत यावी. अगर अमुक पत्रांत व अंकांत लिहिलेलें आहे म्हणून तरी माहिती मिळावी हे विनंती.

पत्ता— मुंबईंत पालवाचे रस्त्यावर हरिबावा यांचे ठाकुरद्वारीं रामचंद्र गोविंदशास्त्री बाम यांस देणें.

## विशेष सूचना.

सदरहू इतिहास जो लिहिला, याचा हेतु फक्त मतें मिळविण्याचाच आहे. ज्यास्त प्रती लिहिण्यास अडचण पडते म्हणून छापविला आहे. तथापि कोणाचे अब्रूच्या संबंधानें नुकसान होऊं नये सबब या प्रतीचा मतें देण्यापुरताच उपयोग होईल अशी तजवीज ठेवावी.

# प्रार्थना.

गीं सज्जनातें असे प्रार्थना कीं ।
गुरूच्याचि द्वारें असे सौख्य नाकीं ॥
ह्मणोनी भजा सद्गुरूच्या कुळाला ।
का ऊपटूं त्या सुखाच्या मुळाला॥ १ ॥
गत्तारकानां जिथें दुःख आहे ।
थें आपदा सर्व देशासि राहे ॥
ह्मणोनी सदा संतकाजा झटावें ।
कृती कष्ट होतां न मागें हटावें॥ २ ॥
े हीनेषु दयालवः स्पृशति यानल्पोपि
ा श्रीमदो, व्यग्रा येच परोपकारकरणे
हृष्यंति ये याचिताः ॥ स्वस्थाः संति च
ौवनोन्मदमहाव्याधिप्रकोपेपि ये,
ैस्स्तंभैरिव सुस्थिरैः किलभरक्रांता धरा
धार्यते ॥ ३ ॥ ___ ॥ ___ ॥

समाप्त.